# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### चिखली (जि.बुलढाणा) शहरासह तालुक्यातील गावांना पाणी पुरवठा होण्याबाबत

**(१) १०३७७ (०७-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील उंद्री १७ गावात प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली होती, सदर योजना सन २००६ पासून आजतागायत बंद आहे त्यामुळे मौजे पिंपरखेड, कारखेड, हाराळखेड, धानोरी, इसोली, मोहदरी व असोला नाईक सदर योजनेतून वगळून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना कार्यक्रमात समावेश करून नवीन नळयोजना मागणी केल्याची माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे डोंगरशेवली, धोडप व पळसखेड सपकाळ, मौजे पेनसावंगी व पाटोदा या गावांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत नवीन नळ योजनाची काम करण्याबाबतचे निवेदन सदर गावातील नागरिकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागास दिले असल्याचे तसेच मौजे रायपुर व पिंपळगांव सराई या दोन गावांचे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत नळ योजनेच्या कामाचे सुधारित प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे माहे ऑगस्ट, २०१४ पासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, चिखली (जि.बुलढाण) शहराला महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनेला प्रशासकीय मान्यता व मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांच्याकडून तांत्रिक मान्यता मिळून देखिल सदर योजनेला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील गावांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेत समावेश करण्यासंदर्भात व चिखली शहराच्या पाणी पुरवठा योजनेच्या काम कार्यान्वित होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक २१.०८.२०१४ अन्वये राज्यातील सर्व शहरांमध्ये नागरी, पायाभुत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी नगर विकास विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानामध्ये (JNNURM) पाणीपुरवठा, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन या योजनांचाही समावेश असल्याने सदर प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांचेकडे मंजूरी व पुढील कार्यवाहीसाठी दि.३० मार्च, २०१५ रोजी पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावामध्ये चिखली नगरपरिषदेचे पाणी पुरवठा योजनेअंतर्गत भांडवली कामाच्या प्रस्तावाचा समावेश असल्याने सदर प्रस्तावाचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानामध्ये समावेश करण्यासाठी करावयाच्या बाबींची पुर्तता करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २ जुलै, २०१५ रोजीच्या पत्रान्वये चिखली नगरपरिषदेस कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मराठवाड्यातील लहान आणि मध्यम धरणातील पाणी साठा कमी झाल्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई

**(२) १४८८८ (०७-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील लहान आणि मध्यम धरणातील पाणी साठ्याची परिस्थिती चिंताजनक झाल्यामुळे उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी टंचाई दूर करण्याकरिता व तेथील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणत्या योजना आखल्या वा आखण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, त्या योजनेचे स्वरुप काय आहे व त्या योजना केव्हा अंमलात आणण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासनाच्या स्थायी आदेशात नमूद केल्याप्रमाणे मराठवाडा विभागात ग्रामीण भागातील पाणी टंचाई निवारणार्थ माहे ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१५ या कालावधीकरिता एकूण १७७७८ गावे व ४८३८ वाडयांकरिता एकूण २७६४५ उपाययोजना समाविष्ट करुन पाणी टंचाई कृती आराखडा प्रस्तावित करण्यात आला होता. त्यापैकी ७५६८ गावे व १६७४

वाडयांमध्ये एकूण १००२६ उपाययोजना केल्या असून त्यावर रु.११८४४.०९ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईबाबा संस्थामधील साई प्रसादालयातील भोजनाच्या तांदळात किडे, भुंगे, कोडे आढळून आल्याबाबत

**(३) १६४४० (०६-०८-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) येथील साईबाबा संस्थामधील साई प्रसादालयातील भोजनाच्या तांदळात किडे, भुंगे, कोडे आढळून आल्याचे दि. १७ एप्रिल,२०१५ रोजी वा सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकृष्ट प्रतिचा हा तांदूळ खरेदी करण्यामागील प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनामार्फत केलेल्या चौकशीत असे आढळून आले की, तांदळाची खरेदी ई-निविदा मागवून केली होती व खरेदी करताना तांदळाचा नमुना विश्लेषकाकडून तपासण्यात आला असून तो प्रमाणित असल्याचे आढळले.
(३) खरेदी करतेवेळी तांदुळ नमुना प्रमाणित होता. परंतु साठवण कालावधीत तांदळात जाळे, किडे झाले असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे शहरातील नवीन जलकुंभाचे काम पूर्ण न झाल्याबाबत

**(४) १६४६७ (२९-०७-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील जुन्या व कालबाहय झालेल्या व अपूर्ण क्षमतेच्या बडगुजर जलकुंभाला पर्याय म्हणून उभारलेल्या समांतर बडगुजर नवीन जलकुंभाचे काम पूर्णत्वास आले, मात्र

त्याठिकाणी पंप स्टेशनचे काम न झाल्याने, पाणी वितरण लांबणीवर पडत चालले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन जलकुंभातून लवकरात लवकर पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०६-०१-२०१६)** :(१) होय.

(२) समांतर बडगुजर नवीन जलकुंभाचे काम पूर्णत्वास आले आहे. तसेच पंपींग मशिनरी बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील शेतक-यांना विंधन विहीरींच्या अधिग्रहणाचा मोबदला मिळण्याबाबत

**(५) २१०३० (२९-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील यावर्षी पाणी टंचाई निवारणासाठी शेतक-यांनी विंधन विहीरीचे मोठया संख्येने अधिग्रहण केले असून सदरील शेतक-यांना त्यांच्या अधिग्रहणाचा मोबदला (अनुदान) त्यांना गत सहा महिन्यापासून देण्यात आलेला नसल्याची माहिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०१-२०१६)** : (१) व (२) हे खरे आहे.

तथापि, लातूर जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी औरंगाबाद विभागास निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर प्राप्त निधीपैकी विहिर अधिग्रहण केलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या अधिग्रहणाचा मोबदला देण्यासाठी जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे रु.३२५.६४ लक्षी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साखर कारखान्यात गाळप हंगाम चालवण्याबाबत राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने घातलेले नियम शिथिल करण्याबाबत

**(६) २१९२६ (१४-०८-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखर कारखान्यात गाळप हंगामात चालवण्याबाबत राज्य प्रदूषण नियंत्रण मं‍ंडळाने घातलेल्या अटी व नियमामुळे प्रतिवर्षी दिनांक १० जून ते १० सप्टेंबर या काळात गाळप व डीस्टीलरीज बंद ठेवाव्या लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने घातलेल्या अटी व नियम शिथिल करण्याची मागणी साखर कारखान्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जाचक अटी शिथिल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२०-०१-२०१६) :**१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दरवर्षी दिनांक १० जून ते १० सप्टेंबर, या कालावधीत फक्त आसवणी उद्योग बंद ठेवण्याची अट संमतीपत्रामध्ये घालून दिलेली असते.

तथापि, साखर कारखान्यात दिनांक १० जून ते १० सप्टेंबर या कालावधीत गाळप बंद ठेवण्याची अट महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संमतीपत्रामध्ये घालून दिलेली नसते. साखर कारखान्यांच्या गाळप हंगामात या उद्योगातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी संनियंत्रण प्रक्रिया यंत्रणा उभारुन व सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी कारखाना परिसरातील बागबगीचे व शेतीसाठी वापरण्याची अट संमतीपत्रामध्ये घालून दिलेली असते.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अशी कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात वैद्यकिय सामुग्री व उपकरणांची जास्त दराने होत असलेली विक्री

**(७) २५०१४ (०६-०८-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी वा शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णावंर उपचारातील प्राथमिक भाग असलेले सलाईन, आयव्ही सेट, टाके घालायला लागणारे स्कीन स्टेपलर अशा विविध प्रकारच्या आवश्यक वैद्यकीय सामुग्रीच्या किंमती होलसेलर्सकडून ४ ते १२ पटीने वाढवून रुग्णांना विकले जातात, या प्रकरणातील तक्रारी वारंवार रुग्ण व त्यांच्या कुटुंबाकडून महाराष्ट्र

राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाकडे आल्यानंतर याबाबतची चौकशी करण्याचा निर्णय अन्न व औषधी द्रव्य प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने वैद्यकिय सामुग्री व उपकरणे विक्री करणाऱ्या मेडीकल्स स्टोअर्स व होलसेलर्स यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. गिरीश बापट (११-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) संबंधित नाही.

(३) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ अंतर्गत वैद्यकीय सामुग्रीतील सलाईन, आय व्ही सेट ही उत्पादने "औषध" या संज्ञेत येत आहेत. परंतु स्की स्टेपलर हे औषध संज्ञेत येत नाही.

औषधांच्या किंमती ठरवणे व औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे हे अधिकार केंद्र शासनाचे असून औषधांच्या किंमती राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणामार्फत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत नियंत्रित केल्या जातात. सदर आदेशातील परिच्छेद १३ व २० नुसार प्रत्येक औषधासाठी MRP बंधनकारक असून, परिच्छेद २६ नुसार औषधे MRP पेक्षा जास्त किमतीने विकण्यास प्रतिबंध आहे. सदर आदेशानुसार फक्त किरकोळ औषध विक्रेत्यांना १६ टक्के नफा मिळावा अशी तरतूद आहे.

औषधे एमआरपी पेक्षा जास्त दराने विकल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. तसेच जी सर्जिकल उपकरणे औषध या संस्थेत येत नाही. त्याचे किंमतीबाबतचे नियंत्रण अन्न व औषध प्रशासनाच्या अख्यत्यारीत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकारी व कर्मचारी पर्यावरण विषयक अभ्यास करण्यासाठी केलेले परदेश दौरे

**(८) २६९६१ (३१-०७-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळातील बरेचसे अधिकारी व कर्मचारी पर्यावरण विषयक अभ्यास करण्यासाठी माहे जानेवारी, २००४ ते जून २०१५ या कालावधीत परदेश दौ-यावर गेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकारी व कर्मचा-यांच्या संबंधीत परदेश दौ-याकरिता मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव व शासनाचे संबंधीत अधिकारी यांची पूर्व परवानगी घेण्यात आली होती काय,

(३) असल्यास, परदेश दौ-यावर गेलेल्या अधिकारी व कर्मचा-यांपैकी किती अधिकारी व कर्मचा-यांनी शासकीय सेवेचा राजीनामा दिला आहे वा अभ्यास दौ-यावरुन आल्यानंतर नजिकच्या काळात सेवानिवृत्त झाले आहेत,

(४) असल्यास, परदेश दौ-यावर गेलेल्या किती अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांनी केलेल्या अभ्यासाचा अहवाल शासनास सादर केला आहे,
(५) असल्यास, अधिकारी व कर्मचा-यांनी अभ्यास दौ-यावरुन आल्यानंतर शासनास सादर केलेल्या अभ्यास अहवालाच्या अनुषंगाने शासनाने पर्यावरण विषयक कोणते प्रस्ताव अंमलात आणले आहेत वा कोणत्या प्रस्तावांमध्ये परकीय गुंतवणूक झाली आहे ?

**श्री. रामदास कदम (०८-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. माहे जानेवारी, २००४ ते जून, २०१५ या कालावधीत मंडळातील ४० अधिकारी परदेश दौऱ्यावर गेले होते.
(२) होय. मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पर्यावरणविषयक प्रशिक्षणाकरिता परदेश दौऱ्यास संबंधित विभागाची पूर्वपरवानगी घेण्यात आली होती.
(३) पर्यावरणविषयक प्रशिक्षणाकरिता परदेश दौऱ्यावर गेलेल्या एकूण ४० अधिकाऱ्यांपैकी दोन अधिकाऱ्यांनी मंडळातील सेवेचा राजीनामा दिलेला आहे.
(४) पर्यावरणविषयक प्रशिक्षणाकरिता परदेश दौऱ्यावर गेलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याबाबतचे संक्षिप्त अहवाल मंडळास सादर केले आहेत.
(५) महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळातील विविध पदावरील अधिकारी प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धन या विषयातील तसेच प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणांच्या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी परदेश दौऱ्यावर जाऊन आले आहेत. सदर प्रशिक्षणाचा प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संवर्धन करण्यासाठी दैनंदिन कामकाजामध्ये निश्चितच उपयोग होत आहे. सदरील प्रशिक्षणानंतर शासनाकडे पर्यावरणविषयक प्रस्ताव सादर करणे किंवा परकीय गुंतवणूक होणे अपेक्षित नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील टेन गावालगत वैतरणा नदीवर बांधण्यात येत असलेल्या बंधा-यांच्या कामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत असल्याबाबत**

**(९) २७२३४ (१७-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील टेन गावालगत वैतरणा नदीवर बांधण्यात येत असलेल्या बंधा-यांच्या कामात अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) समुद्राचे खारट पाणी पिण्याच्या पाण्यात मिश्रीत होऊ नये म्हणून टेन गावालगत वैतरणा नदीवर बंधा-याचे काम सुरु आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदरहू कामाची पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने सदरहू बंधा-याच्या कामात वापरण्यात आलेले गंज प्रतिबंधक स्टील न वापरता लोखंडी सळ्यांना हाताने रंग लाऊन त्या सळ्या वापरण्यात येत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, कामाच्या उपरोक्त संदर्भात संबंधीत अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(४) सदर बांधकामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरलेले नाही. आर.सी.सी.बंधाऱ्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावयाचे असल्याने जेवढया गंजप्रतिबंधक (FBEC) लोखंडी सळ्या प्राप्त झाल्या तेवढया वापरण्यात आल्या व काम सुरु असताना या सळ्यांचा तुटवडा झाल्यानंतर काम थांबू नये या उद्देशाने तसेच कामाची निकड लक्षात घेऊन लोखंडी सळ्यांना Epoxy Paint लावून सदर बांधकाम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेशनच्या धान्य द्वार पोहोच योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई**

**(१०) २८३५१ (२१-१२-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येणाऱ्या रेशनच्या धान्याचा द्वार पोहोच या योजनेच्या अंमलबजावणीत दिरंगाई होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ नागरिकांना व्यवस्थित व वेळेवर व्हावा म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार अन्नधान्य शासकीय वाहतुकदाराकडून रास्त भाव दुकानदारापर्यन्त पाहोचविले जाते. धान्याचा अपहार टाळण्याच्या दृष्टीकोनातून वाहतुकदाराने त्याच्या वाहनांना हिरवा रंग देणे त्यावर सुधारित धान्य वितरण पध्दत असे ठळकपणे लिहिणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या जिल्ह्यातील वाहनांवर GPS यंत्रणा प्रायोगिक स्तरावर बसविण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील शिधावाटप दुकानांमधील धान्यात होत असलेल्या भेसळीबाबत**

**(११) २९०८८ (२१-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शिधावाटप दुकानांमधील धान्यात वाळू, माती, दगड,बुरशीजन्य धान्य इत्यादी भेसळ करण्यात येत असल्याचे तसेच भुदरगड तालुक्यातील शिधावाटप दुकानांमार्फत देण्यात येणाऱ्या गव्हात सिमेंटची भेसळ होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अन्नधान्य पुरवठा विभागातर्फे शिधावाटप दुकानांची मासिक तपासणी केली जात नसल्याच्या अनेक तक्रारी जिल्हा पुरवठा विभागाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने ग्राहकांना दर्जेदार धान्य मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर जिल्ह्यात निकृष्ट व भेसळयुक्त धान्य व गव्हाचा पुरवठा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) नाही.

दै. सकाळ मधील दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी बातमीनुसार आलेल्या निगरवे खालसा ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानातील गव्हाच्या पोत्यामध्ये वाळू, माती मिश्रीत गहु आणि बुरशीजन्य धान्य आढळून आले. या बाबत तहसिलदार, करवीर यांनी तपासणी केली असता ऑगस्ट, मध्ये एकूण १९४४२ बॅग्ज पैकी ५ बॅग्ज मध्ये वाळू, माती मिश्रीत गहू आढळून आले सदर वस्तुस्थिती निदर्शनास आल्या बरोबर गव्हाचे पोती बदलून देण्यात आली. तसेच माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये भुदरगड तालुक्यासाठी पुरवठा करण्यात आलेल्या ७४३८ बॅग्ज मध्ये काही अंशी खडे व भुसा मिक्स असल्याचे निदर्शनास आल्यानंतर धान्य बदलुन देण्यात आले त्यामुळे शिधापत्रिकाधारकांना माती मिश्रीत/खडे/भुसा मिश्रीत धान्य वाटप करण्यात आले नाही.

(२) व (३) दिनांक १२ जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर जिल्हात सन २०१४-१५ मध्ये १५७७ दुकानांच्या २१६७ तपासण्या करण्यात आल्या या तपासण्या मध्ये दोषी आढळून आलेल्या १५ दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भालेगाव बाजार (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथील**
**स्वस्त धान्य दुकानदारावर कारवाई करण्याबाबत**

**(१२) २९१६५ (२१-१२-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भालेगाव बाजार (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथील स्वस्त धान्य दुकानदार मनमानी कारभार करीत असून ते शासकीय योजनाप्रमाणे नागरिकांना धान्य पुरवठा करीत नसल्याबाबत सरपंच यांनी तहसीलदार खामगाव यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत तहसीलदार यांना कारवाई करण्याबाबत पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तहसीलदार यांना वारंवार तक्रार करून देखील स्वस्त धान्य दुकानदार यांच्यावर कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास व नागरिकांना शासकीय सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदाराचा परवाना निलंबनाचे आदेश देण्याबाबत तसेच सदर दुकानदाराबाबत वारंवार तक्रारी करून देखील कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मौ. भालेगाव बाजार (ता. खामगाव, जि. बुलढाणा) येथील स्वस्त धान्य दुकानाची तपासणी केली असता, सदर दुकानात अनियमितता आढळून आल्याने, जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१६ च्या आदेशान्वये सदर रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र निलंबित केले असून, शिधापत्रिकाधारकांची गैरसोय होऊ नये म्हणून सदर दुकानाचे शिधापत्रिका जवळच्या स्वस्त धान्य दुकानास जोडण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेलगाव उजाड शिक्षक कॉलनी (ता. शेगाव, जि. बुलडाणा) येथील**
**पाणी पुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१३) २९१७७ (२१-१२-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेलगाव उजाड शिक्षक कॉलनी (ता. शेगाव, जि. बुलडाणा) येथील पाणी पुरवठा योजना शासनाने मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना पूर्ण होऊन देखील परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर ठिकाणी नियमित पाणीपुरवठा होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) योजनेचे काम प्रगतीत असुन शिक्षक कॉलनीस माहे डिसेंबर, २०१५ पासून नियमित पाणी पुरवठा सुरु केला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) नियमित पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, टाकीची किरकोळ कामे पुर्ण झाल्यानंतर टाकीद्वारे पाणी परुवठा सुरु करुन दैनंदिन देखभाल करिता ग्रामपंचायत शिरजगांव निळे यांना योजना हस्तांतरीत करण्यात येईल.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) मतदार संघातील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनांची चौकशी करणेबाबत**

**(१४) २९१८५ (२१-१२-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि. बुलढाणा) मतदार संघात सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत सुरु असलेल्या किती पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली आहे,
(2) असल्यास, सदर योजनेतून गावागावांमध्ये पाणी देण्याच्या नावाखाली कंत्राटदार व अधिकारी यांचे संगनमताने गैरव्यवहार करून नळ योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत ४५ गावातून गैरव्यवहार झाल्याप्रकरणी तसेच नळ योजनेचे काम निकृष्ट झाल्याप्रकरणी सरपंचांनी तक्रारी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, सदर तक्रारीसंबंधात शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :** (१) खामगांव (जि.बुलढाणा) मतदार संघात सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये एकुण २७ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली आहे.
(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मंजूर २७ पाणीपुरवठा योजनांपेकी, १५ योजना पूर्ण झाल्या असून १२ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. पूर्ण झालेल्या १५ योजनांमधून टंचाई परिस्थितीत सुध्दा पाणी पुरवठा सुरु आहे.

खामगांव व शेगांव तालुक्यातील ४५ योजना भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत सन २०१० पूर्वी पूर्ण झाल्या आहेत. सदर योजनांपैकी ५ ग्रामपंचायत नवनियुक्त सरपंचांनी योजनांच्या दर्जाविषयी तक्रारी दिल्या असून, याबाबत कार्यक्रम अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा , जिल्हा परिषद, बुलढाणा व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची संयुक्त चौकशी नेमण्यात आली असून, सदर समितीमार्फत चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाळुंगे (देवगड) (जि.सिंधुदूर्ग) येथे रेशन दुकानाचा परवाना मिळण्याबाबत**

**(१५) ३०२७३ (२१-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाळुंगे (देवगड) (जि.सिंधुदूर्ग) गावातील लोकांना फणसगाव येथील रेशन दुकानावरुन आणण्यासाठी दहा कि.मी. पायपीट करावी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाळुंगे येथील माजी सैनिक कुमार राणे यांनी शासनाकडे रेशन दुकानाचा परवाना मिळण्याबाबत मागणी करुनही अदयापि यासंदर्भातील कार्यवाही देखील करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रेशन धान्य दुकानाची व्यवस्था तातडीने गावातच करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(५) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) महाळुंगे (देवगड) जि. सिंधुदुर्ग येथील रास्तभाव दुकानदारानी राजीनामा दिल्याने, त्या ठिकाणी नवीन दुकान मंजुरीसाठी ५ वेळा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला असून, सदर जाहिरनाम्याच्या अनुषंगाने एकही बचत गटाचा प्रस्ताव प्राप्त झाला नाही, परंतु सदर जाहीरनाम्याच्या अनुषंगाने श्री. कुमार राणे यांच वैयक्तिक अर्ज प्राप्त झाला असून, सदर अर्जाची छाननी सुरु आहे.

---

**राज्यात शिधापात्रिका आधारकार्ड लिंकला जोडून बायोमेट्रिक करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(१६) ३०२८८ (२१-१२-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ कोटी ३७ लाखाहून अधिक शिधापत्रिका आधारकार्डच्या लिंकला जोडून त्या बायोमेट्रिक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे व सदर निर्णय घेऊनही शिधापात्रिका बायोमेट्रिक करण्याची पध्दत अद्यापि सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहिमेअंतर्गत राज्यात जिल्हा निहाय किती शिधापत्रिकाधारकांची आधार जोडणी झालेली आहे व उर्वरित आधार जोडणीचे काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे शासनास अपेक्षित आहे,

(३) असल्यास, बायोमेट्रीक पध्दत केव्हापासून सुरु होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२९-०१-२०१६) :**(१) होय.

(२) या योजनेवर राज्यात काम सुरु असून राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत राज्यातील एकूण ७ कोटी लाभार्थ्यांपैकी ३ कोटी ९१ लाख लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकांचे सिडींग करण्यात आले आहे.उर्वरित काम प्रगतीपथावर असून ते जून, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(३) रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे ऑटोमेशन करुन बायोमेट्रिक पध्दतीने शिधावस्तूंचे वितरण करण्याच्या प्रक्रियेत सहाय्य करण्यासाठी विभागातर्फे मे.ॲक्सेंचर यांना प्रकल्प सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. या कंपनीने fair Price Shop (FPS) Automation (रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे ऑटोमेशन) करीता निविदा प्रक्रिया सुरु करण्यासाठी Request For Proposal (RFP) तयार केली असून शासनाच्या मान्यतेनंतर निविदना प्रक्रिया राबवून Fair Price Shop (FPS) Automation (रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे ऑटोमेशन) सुरु करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गॅस कनेक्शन असणाऱ्या शिधापत्रिकाधारकास रॉकेल देण्याबाबत**

**(१७) ३०४५० (२१-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गॅस कनेक्शन असणा-या कुटूंबास रॉकेल बंद करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१५ पासून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार कोल्हापूर जिल्ह्यात अप्राधान्य शिधापत्रिकाधारक माहे ऑक्टोबर, २०१४ पासून धान्यापासून वंचित असताना शासनाने दिनांक १ सप्टेबर, २०१५

पासून सिलेंडरधारकांना रॉकेल देणे बंद केल्याने सर्वसामान्य कुटूंबाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यात ६ लाख २५ हजार ४१८ शिधापत्रिका असून यामध्ये फक्त ३ लाख २० हजार ८३० जणांकडे गॅस कनेक्शन आहे. तरीही रॉकेलचा कोटा ४ लाख ८ हजार लिटरने कमी करण्यात आला असल्याचे माहे २९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) तसेच माळशिरस व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात केरोसिनच्या कोट्यात कोणतीही कपात केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सर्वसामान्य कूटूंबांना धान्य आणि गॅस सिलेंडरला पर्याय म्हणून पूर्ववत रॉकेल देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१६) :** (१) दि. २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन आदेशान्वये राज्यात केरोसिनचे सुधारित परिणाम निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार गॅसधारक शिधापत्रिकाधारकांना केरोसिन मिळण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे,

(२) हे खरे नाही.

(३) दि. २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन आदेशान्वये निश्चित करण्यात आलेल्या सुधारित परिमाणानुसार अनुज्ञेय असलेला केरोसिन कोटा सोलापूर जिल्ह्यास मंजूर करण्यात आला आहे.

(४) हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐरोली (जि.ठाणे) येथे स्वतंत्र शिधावाटप कार्यालय स्थापन करणेबाबत**

**(१८) ३०४७० (२१-१२-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (जि.ठाणे) येथे स्वतंत्र शिधावाटप कार्यालयासाठी नवी मुंबई महापालिकेने जागा उपलब्ध करुन देऊन तसे उपनियंत्रक शिधावाटप, ठाणे यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेचा भाडेकरार अद्याप करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय, भाडेकरार कधीपर्यंत करण्यात येईल व नविन शिधावाटप कार्यालय कधीपर्यंत सुरु करण्यात येईल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) होय. ऐरोली (जि.ठाणे) येथे स्वतंत्र शिधावाटप कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय झालेला नाही.

---

**शिक्रापुर (ता.शिरुर, जि.पुणे) येथील नळपाणी पुरवठा योजनेला मान्यता देण्याबाबत**

**(१९) ३०६२४ (२१-१२-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्रापुर (ता.शिरुर, जि.पुणे) येथील नळपाणी पुरवठा योजनेला शासनाने सन २०१४ मध्ये वा त्यादरम्यान तांत्रिक मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०१-२०१६) :**(१) होय.
मुख्य अभियंता (ग्रामीण व नागरी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी सप्टेंबर, २०१४ मध्ये तांत्रिक मान्यता दिली आहे.
(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शिक्रापूर (ता.शिरुर,जि.पुणे) नळ पाणीपूरवठा योजनेला दि.२० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साटेली - भेडशी (ता.दोडामार्ग,जि.सिंधुदूर्ग) येथील गोडाऊनमध्ये ठेवण्यात येणारे रेशन धान्य दुकानाचे गहू निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२०) ३०७९९ (२१/१२/२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साटेली - भेडशी (ता.दोडामार्ग,जि.सिंधुदूर्ग) येथील २१ रेशन धान्य दुकानांचे वितरित करण्याकरिता असलेले धान्य गोदामामध्ये ठेवले जाते परंतु सदर धान्यातील ९० टन निकृष्ट दर्जाचा गहू वितरीत करण्यास ग्रामस्थांनी विरोध केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त तालुक्यातील गावांना स्वच्छ तसेच उत्कृष्ट धान्यपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०/१/२०१६) :** (१), (२) व (३) माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये रास्तभाव धान्य दुकान उसप (ता.दोडामार्ग) येथे वितरीत करणेत आलेले ६३.५० क्विंटल गव्हामधील काही पोत्यांमध्ये जव (काळ्या रंगाचे धान्य) व गव्हाच्या गवताच्या काड्या अंशत: प्रमाणात आढळून आल्याने सदर धान्यासाठा रास्तभाव धान्य दुकानदाराकडून परत घेऊन रास्त भाव धान्य दुकानदारांना चांगल्या दर्जाचा गहू वितरीत करण्यात आला आहे. दोडामार्गतालुक्यातील अन्य रास्तभाव दुकानांकडून वितरीत गहू खराब असल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

---

**ठाणे येथील रेशनचा काळाबाजार थांबवा व इतर मागण्यांसाठी महिला संघटनांनी शिधावाटप कार्यालयावर काढलेला मोर्चा**

**(२१) ३१६२३ (२१-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील रेशनचा काळाबाजार थांबवा व इतर मागण्यांसाठी महिला संघटनांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शिधावाटप कार्यालयावर मोर्चा काढलेला होता तसेच पुढील काळात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर प्रकरणी रेशन दुकानदारांकडून धान्यांचा मोठ्या प्रमाणात काळा बाजार केला जात असल्याने यासंदर्भात कारवाई करण्यासाठी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :**(१), (२) व (३)

दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी महिला संघटनांचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात नमूद केलेल्या अधिकृत शिधावाटप दुकानांच्या तपासण्या करण्यात आलेल्या आहेत. मंजूर करण्यात आलेले धान्य शिधापत्रिकाधारकांना मिळाले की नाही याची गृह भेटी देऊन खातरजमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**उरण (जि.रायगड) मधील शासनमान्य रास्तभाव दुकान व किरकोळ रॉकेल विक्री दुकानदारांच्या व शिधापत्रिकाधारकांच्या समस्येबाबत**

**(२२) ३१७२३ (२१-१२-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) मधील शासनमान्य रास्तभाव दुकान व किरकोळ रॉकेल विक्री दुकानदारांच्या व शिधापत्रिकाधारकांच्या समस्येबाबत दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या

सुमारास तहसिलदार, उरण तालुका, जि.रायगड यांना शासनमान्य रास्त भाव दुकानदार संघटना, उरण यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, सदर मागण्यासंदर्भात शासनाने कोणते निर्णय घेतले आहेत वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :**(१) होय,
(२) निवेदना मध्ये रॉकेल कपात मागे घेणे, धान्य विक्री कमिशनमध्ये वाढ करणे, एपीएल कार्ड धारकांना धान्य वितरण पुरवठा करणे, तसेच रास्तभाव दुकानामध्ये दोन कामगारांचा पगार, दुकानाचे जागेचे भाडे, वीज बील, धान्य वाहतूक, हमाली व दुकानादारांना मानधन देणे, दुकानदारांना मानधन व स्टेशनरी खर्च इत्यादीखर्चासाठी दुकानदारांना प्रति महिना रु. ५०,०००/- इत्यादी मागण्या केल्या आहेत,
(३) व (४) राज्यातील रेशन दुकानदारांच्या काही संघटना कडून त्यांच्या अडचणी बाबतची निवेदन शासनाकडे प्राप्त होतात. त्या अनुषंगाने संघटनेच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन उचित कार्यवाही केली जाते.

---

### राज्यात संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा करण्याचा निर्णय

**(२३) ३२५६७ (२१-१२-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाने कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (३०-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) पाणी टंचाई निवारक उपाययोजनांचे त्रैमासिक कृती आराखडयांपैकी ऑक्टोबर, २०१५ ते डिसेंबर, २०१५ पर्यंतचे कृती आराखडा तयार करण्यात आले आहेत.
माहे जानेवारी, २०१६ ते मार्च, २०१६ व एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ पर्यंतचे त्रैमासिक कृती आराखडे तयार करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावरुन सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांच्या पाणी योजनांची वीज देयके थकित असल्याने पाणी पुरवठा बंद असल्याबाबत

**(२४) ३२८७४ (२१-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेंतर्गत चालणाऱ्या ३० गावांचा समावेश असलेल्या २७ पाणीपुरवठा योजनांच्या कामांपैकी कासेगाव, खर्डी व भालवणी या तिन्ही गावांच्या पाणी पुरवठ्याची रुपये १५ लाख वीज देयके गत दोन वर्षापासून थकित असल्यामुळे सदर पाणी पुरवठा योजना बंद होत्या, तसेच माहे जून, २०१५ मध्ये सदर गावांच्य ग्रामपंचायतीनी ५० टक्के रक्कम भरुनही त्या योजना सुरु नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीन गावांच्या पाणीपुरवठा योजनेची कामे त्वरीत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०१-२०१६) :** (१) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत योजनांच्या समाविष्ट गावांनी ५० टक्के विद्युत देयके भरलेली असून उर्वरित ५० टक्के देयके जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फत भरण्यात आलेली आहेत.

(२) भाळवणी व कासेगांव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीकरिता अनुक्रमे रु.११.७४ लक्ष व रु.२३.२५ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास जिल्हा परिषदेने देखभाल दुरुस्ती निधी मधून मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत निविदा काढण्यात आल्या असून आवश्यक ती दुरुस्ती करुन योजनां परत चालू करण्यात येत आहेत.

तसेच, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दि.०८.१२.२०१५ रोजीच्या टंचाई आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार खर्डी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देणेकरिता श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून निधी उपलब्ध होताच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापुर) तालुक्यातील आंधळगाव, नंदूर या दोन नळपाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(२५) ३२८७६ (२१-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापुर) तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आंधळगाव, नंदूर या दोन मंजूर नळपाणीपुरवठा योजना केवळ अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे योजना प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे कय,

(२) असल्यास, सदर योजनांमुळे १० ते १२ गावांना पाणी पुरवठा होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना बंद पडल्या असून या योजनेच्या पाईपलाईन जागोजागी फुटलेल्या अवस्थेत आहेत तसेच सदर योजना जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे आवश्यक असतानाही त्या करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत व संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०१-२०१६)** :(१) हे खरे नाही.

आंधळगाव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना पुर्ण आहे. तर नंदूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना कार्यन्वित केलेलीअसून योजनेमधून २०१३ च्या टंचाईमध्ये सर्व गावांना पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे. परंतू योजनेची काही अनुषंगिक कामे अपुर्ण आहेत.

(२) होय सदर योजनांमुळे एकूण २२ गावांना पाणीपुरवठा होऊ शकतो.

(३) व (४) दोन्ही योजनांमधील समाविष्ठ गावांची पाणी मागणी नसल्याने योजनां सन २०१३ पासून बंद ठेवल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने दि.३०.०४.२०१५ रोजीच्या ठरावान्वये आंधळगाव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीकरिता रु.६४.७३ लक्ष किंमतीचे व नंदूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीकरिता रु.१८.१८ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक मंजूर केले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत निविदा काढण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने आवश्यक ती दुरुस्ती करुन पाणीपुरवठा सुरु करण्यात येईल व योजना जिल्हा परिषदेने गठित केलेल्या गावांच्या शिखर समितीकडे हस्तांतरित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत

**(२६) ३२९४२ (२१-१२-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) या गावच्या रु. १२,८९,८३,१२०/- च्या नळपाणी पुरवठा योजनेला दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडून शासन निर्णय काढून अंतिम मान्यता देऊनही आजतागायत निविदा काढून काम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार नळपाणी पुरवठा योजनेची निविदा काढून सदर नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदर योजनेच्या कामाचे अंदाजपत्रक किती आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत सन २०१५-१६ च्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत केंद्रशासनाचे निर्देशांनुसार शासनपत्र दि. ३०.६.२०१५ अन्वये सन २०१५-१६ मधील सुरु न झालेल्या योजनांची कामे पुढील आदेश होईपर्यंत हाती घेण्यात येवू नये असे निर्देश आहेत.
(२) मुख्यमंत्री पाणी पुरवठा कार्यक्रमा अंतर्गत सन २०१५-१६ च्या आराखडयात सदर योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.
(३) योजनेच्या कामांची अंदाजपत्रक रु. १२,८९,८३,१२०/- एवढया किंमतीची आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या केरोसिन कोटयात होत असलेल्या कपातीबाबत**

**(२७) ३३०१० (२१-१२-२०१५). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने देशभरात केरोसिन कोटा कमी करण्याचा निर्णय घेतला असून राज्याचा कोटा केंद्र शासनाने सुमारे १२ टक्क्यांनी कमी केल्याने राज्यातील गोर-गरीब जनतेची तसेच केरोसिनची पर्यायी इंधन म्हणून वापर करणाऱ्या लोकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य येत्या २ वर्षात केरासिन मुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयामुळे राज्यातील सुमारे ३ लक्ष केरोसिन परवानाधारकांचा व्यवसाय बंद पडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्याला मिळणाऱ्या केरोसिन कोटयात वाढ करण्यासाठी राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१६) :** (१) केंद्र शासनाकडून राज्याच्या केरोसिन कोट्यात वेळोवेळी कपात करण्यात आली आहे. दि. २० ऑगस्ट २०१५ च्या शासन आदेशान्वये राज्यात केरोसिनचे सुधारित परिणाम निश्चित करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सुधारित

परिणामानुसार राज्याच्या आवश्यकतेच्या १०० % इतक्या प्रमाणात केरोसिन केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत आहे. यास्तव केरोसिनची पर्यायी इंधन म्हणून वापर करणाऱ्या लोकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते आहे, हे खरे नाही,

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात शिधापत्रिकेच्या ऑनलाईन कामात त्रुटी व चुका असल्याबाबत**

**(२८) ३३१५६ (२१-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यात शिधापत्रिकेचे सुरु असलेल्या ऑनलाईन कामात बऱ्याच त्रुटी व चुका असल्यामुळे डाटा दुरुस्ती करुन मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. अन्न व नागरी पुरवठा राज्य मंत्री यांना दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डाटा दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :**(१) होय.

(२) नाशिक जिल्ह्यात संगणकीकृत शिधापत्रिकांची माहिती व लाभार्थ्यांकडून संकलित केलेली माहिती तपासून त्यामधील त्रुटींचे निराकरण करुन त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगाव मतदार संघातील रेशनकार्ड संबंधित सर्व कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) ३३२६७ (२१/१२/२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील रेशनकार्ड संबंधित नवीन कार्ड बनविणे, विभक्त करणे, नवीन नाव जोडणे इत्यादी कामे बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशनकार्ड अभावी स्वस्त धान्य दुकान, पासपोर्ट, ओळख, सिलेंडर मिळणे, विद्यार्थ्यांच्या विविध दाखल्याकरिता आवश्यक आहे त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी नागरिकांना तात्काळ रेशन कार्ड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२/२/२०१६) :**(१) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव तालुक्यात अच्च पदस्थ व्यक्तींच्यस नावे शिधापत्रिका तयार केल्याचे उघडकीस आल्यावरुन तक्रार व प्रशासकीय चौकशीकरीता शिधापत्रिका विभागाला सील लावण्यात आले होते. त्यादरम्यान शिधापत्रिकांचे सर्व काम स्थगीत आले होते. त्यादरम्यान शिधापत्रिकांचे सर्व काम स्थगीत होते. त्यानंतर सप्टेंबर, २०१५ मध्ये सिल उघडण्यात आले.
(२) हे, खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रलंबीत असलेले सर्व अर्ज व त्यादरम्यान आलेले अर्ज नाव कमी/जास्त दुय्यम शिधापत्रिका निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरित १० टक्के काम दि. ३१.१.२०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये गढुळ पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत**

**(३०) ३३७३४ (२१-१२-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्‌वारे गढुळ पाण्याचा पुरवठा होवून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, दर्यापूर यांनी योग्य पाणी पुरवठा करण्याबाबत,पाण्याची गळती थांबविण्याबाबत, गढुळ पाण्याचा पुरवठा करु नये तसेच सर्व नागरीकांना समतोल पाणी पुरवठा करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता व इतर संबंधित अधिकारी यांना देवूनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी शुध्द व समतोल पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

पावसाळयामध्ये गढूळ पाणी मिळत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती, मात्र सदर प्रकरणी दुरुस्ती करुन शुध्द पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

(२) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) तालुक्यामध्ये शुध्द व समतोल पाणी पुरवठा करण्यासाठी वितरण व्यवस्थेअंतर्गत पाईप लाईन टाकण्याचा रु. २२१.७९ लक्ष किंमतीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा. अमरावती यांना सादर झाला असून, सदर योजना ४० लि. दरडोई प्रमाणे करण्यात आली आहे. शहरी भागाकरिता ७० लि. प्रमाणे पुरक योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती, यांचे मार्फत तयार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मल्लिकार्जुन वस्ती,बलसुर (ता.उमरगा,जि.उस्मानाबाद) येथे स्वस्त धान्य दुकान मंजूर करणेबाबत

**(३१) ३३७९६ (२१-१२-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मल्लिकार्जुन वस्ती, बलसुर (ता. उमरगा जि.उस्मानाबाद) येथील नागरिकांच्या सोयीसाठी नवीन स्वस्त धान्य दुकान मंजुर करणेबाबत येथील स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहारा यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) शासन निर्णय ३ नोव्हेंबर, २००७ नुसार मल्लिकार्जुन, ता. उमरगा येथे नविन रास्तभाव दुकान मंजूर करण्यासाठी जाहिरप्रगटन केले. त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

---

## पुणे जिल्हा परिषदेने 'साथरोग मुक्त पाणी गुणवत्ता जनजागृती' मोहिम राबविण्यात आल्याबाबत

**(३२) ३३९०३ (२१-१२-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेने दिनांक २५ मे ते १५ जून दरम्यान १४०५ ग्रामपंचायतीमध्ये 'साथरोग मुक्त पाणी गुणवत्ता जनजागृती मोहिम राबविण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील सर्वेक्षणात १५३ गावातील पाण्याचे स्त्रोत अशुध्द असून जिल्हा परिषदेने अशा गावांना पिवळे कार्ड दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्हयातील अशुध्द पाण्याचे स्त्रोत असलेल्या गावांना जिल्हा नियोजन समिती मधून पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याचे संयंत्र (आरओ) बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८/१/२०१६) :** (१) होय, खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
पिवळे कार्ड देण्याचे निकष हे पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्ती योग्य प्रकारे होते की नाही, अशा पुढील निकषांवर देण्यात येते. स्त्रोता भोवतालचा परिसन अस्वच्छ, शौचालय, गाई-गुरांच्या गोठ्यात १५ मीटर पर्यंत पाणी साचून राहिल्यास, पाईप लाईन व व्हॉल्व गळती, तोटी विना नळ, पाईप लाईन गटरीतून गेली असल्यास, मागील तीन महिन्यात पाणी नमूना पिण्यास अयोग्य असल्यास, विहिरीस जाळी नसल्यास या निकषा आधारे स्त्रोतास गुण देऊन ग्रामपंचायती मधील ७० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या तीव्र जोखीम अथवा अल्प जोखमीच्या स्त्रोतांवर अवलंबून नसल्यास त्या ग्रामपंचायतीस पिवळे कार्ड देण्यात येते.
(३) व (४) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सांडपाण्यामुळे मुळा-मुठा व भिमा नदीचे तसेच उजनी जलाशयातील पाणी दुषित झाल्यामुळे दुषित झाल्यामुळे यांचे काठावर असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत बाधित झाल्याचे आढळून आले आहे. अशा योजनांसाठी शुध्द पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.सयंत्र बसविण्यासाठी सदर दोन्ही महापालिका यांनी जिल्हा परिषद पुणे यांचेकडे रक्कम रु. १३८३.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. या उपलब्ध निधीतून एकूण १२१ ठिकाणी आर.ओ. सयंत्र बसविण्यास मंजूरी देण्यात आलेली असून त्यापैकी ८९ कामे पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. व उर्वरित ३२ कामे प्रगती पथावर आहे.

---

## नांदेड जिल्हयातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे काम धंदयासाठी स्थलांतरीत होत असतात अशा कुटुंबाच्या नावे येणारे धान्य शासनाकडे जमा करण्याबाबत

**(३३) ३३९५१ (२१-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, शेतकरी, शेतमजूर यांची कुटुंबे सतत वर्षानुवर्ष काम धंदयासाठी परजिल्हयात व परराज्यात काही महिन्यांसाठी स्थलांतरीत होत असतात अशा कुटुंबाच्या नावे येणारे रास्त भाव दुकानातील धान्य वेळोवळी शासनाकडे किंवा पुरवठा विभागाकडे जमा केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारे आतापर्यंत किती कुटुंबाचे किती धान्य परत शासनाकडे जमा करण्यात आले आहे,
(३) नसल्यास, त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील अपूर्ण अवस्थेत असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत**

**(३४) ३४०२२ (२१-१२-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील अपूर्ण अवस्थेत असलेल्या पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील किती योजना अपूर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत, यावर किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर योजना पूर्ण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०१-२०१६) :** (१) होय.
केंद्र शासनाच्या दि.२९.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने शासनाने दि.१४.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रगतीपथावरील/अपुर्ण अवस्थेतील योजना प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.
(२) सांगली जिल्ह्यात खालील कारणास्तव ९४ योजना अपूर्ण अवस्थेत आहेत.

| अपुर्ण असण्याची कारणे | योजनांची संख्या |
|---|---|
| १.अंतर्गत वाद | २६ |
| २. न्यायालयीन प्रकरणे | ०३ |
| ३.शासनाकडून सुधारित मंजूरी प्राप्त | ०२ |
| ४.उद्भव कोरडा पडल्यामुळे | ०३ |
| ५.मंद गतीने काम सुरु | ५९ |
| ६.इतर खात्याच्या परवानगी अभावी | ०१ |

सदर योजना पूर्ण करणेसाठी रु.७४.२४ कोटी इतका निधी अपेक्षित आहे.
(३) सांगली जिल्ह्यातील अपुर्ण योजना पूर्ण करणेसाठी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत रु.१०२२.३१ लक्ष व केंद्र हिस्सा रु.१०६८.६८ लक्ष असा एकूण रु.२०९०.९९ लक्ष इतका निधी डिसेंबर अखेर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अपुर्ण योजनांपैकी डिसेंबर, २०१५ अखेर १३ योजना व ३२

वाड्या-वस्त्यांची कामे पुर्ण करुन पाणीपुरवठा सुरु करणेत आला आहे. उर्वरित योजनांची कामे निधी उपलब्धतेनुसार मार्च, २०१६ अखेर पुर्ण करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी पुरवठा स्त्रोताच्या विहिरीच्या नळांचे पाणी दूषित आढळल्याबाबत**

**(३५) ३४१२६ (२१-१२-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापूर (जि.ठाणे) या तालुक्यातील गावपाडयांना पाणी पुरवठा स्त्रोताच्या विहिरींच्या नळांच्या सुमारे १ हजार २४३ पाण्याच्या नमुन्यांची ठाणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी केली असता त्यातील १२३ पाण्यांचे नमूने दूषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तपासणीत आढळून आलेल्या १२३ पाण्यांच्या दुषित नमुन्यांच्या अनुषंगाने सदरहू गावातील जनतेस शुध्द पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर गावातील दूषित आलेले पाणी नमुने निष्कर्षाबाबत सर्व पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांमार्फत संबंधित ग्रामपंचायत व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कळविण्यात आले असून सदर दुषित आढळलेल्या पाण्याच्या स्त्रोताबाबत योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही ग्रामपंचायती मार्फत करण्यात आलेली आहे.

---

**मौजे ढोरवी (ता.सिंदखेड राजा जि.बुलढाणा) येथील आमदार निधीतून मंजूर झालेल्या विहीरीतून लोकांना पाणी मिळण्याबाबत**

**(३६) ३४२६९ (२१-१२-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे ढोरवी (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथील पिण्याच्या पाण्यासाठी आमदार निधीतून पाणी पुरवठ्याची विहिर व पाईपलाईनचे काम करण्यासाठी मौजे हनवतखेड (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) शिवारातील गट नं.४६ क्षेत्र ०.२. आर.जमीन श्री.भगवान मुरकुटे यांनी ग्रामपंचायत ढोरवी करीता रजिस्टर दानपत्र क्र. २३४०, दिनांक १४ सप्टेंबर, २००५ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरी व पाईपलाईन ग्रामपंचायतीला हस्तांतर झाली आहे काय, असल्यास सातबारा उताऱ्यावर श्री.मुरकुटे यांचे नाव कसे काय चढविण्यात आले आहे तसेच उक्त विहिरीवरील विद्युत पंपाचे बिल हे शासनाकडून भरण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी सरपंच श्री.मुरकुटे हे आमदार निधीतून मंजूर झालेल्या विहिरीतून गावातील लोकांना कमी पाणी व आपल्या शेतीला जास्त पाणी वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, उक्त जमीनीतील गावातील लोकांना पाणी मिळण्याच्या दृष्टीने विहिर बांधण्यात आलेली असतांना लोकांना पाणी मिळत नसल्याने सदर व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) नाही.

सदर योजना हस्तांतरीत झाली आहे. सातबारावर सरपंच ग्रामपंचायत ढारेवी यांचे नाव आहे. श्री. मुरकुटे यांचे नाव नाही. तसेच विद्युत बिल हे ग्रामपंचायत मार्फत भरण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) पाण्याची टाकी भरल्यावर ओव्हरफ्लो चे शेताकडे वाहणारे पाणी ग्रामपंचायतने यापुर्वी बंद केलेले आहे. सदर योजनेद्वारे उक्त गावाला पाणी सुरु आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मांजरी बु. (ता. हवेली, जि. पुणे) येथील पाणीपुरवठा योजने बाबत

**(३७) ३४३९२ (२१-१२-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरी बु. (ता. हवेली, जि. पुणे) या गावासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ४८ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करून त्याची निविदा माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होवुन सुद्धा अद्यापपर्यंत शासनाच्या मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर निविदेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२२-०१-२०१६) :**(१) होय.

शासनाने दि.०२.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.४२.९६ कोटी इतक्या किंमतीच्या मांजरी नळ पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर योजनेची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जून, २०१५ मध्ये काढली आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या दि.२९.०६.२०१५ व दि.२९.०७.२०१५ च्या पत्रान्वये ज्या योजना प्रगतीपथावर आहेत त्यांनाच निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. ज्या योजना नियोजन टप्पा/निविदा प्रक्रियेत आहेत अशा योजनाबाबत पुढील कार्यवाहीस स्थगिती ठेवण्याच्या सुचना दि.१३.०७.२०१५ च्या पत्रान्वये येऊ नये अशा सुचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर योजनेची निविदा अद्याप स्विकृत करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासनाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत ग्रामीण व शहरी भागाकरिता केरोसिन वितरणाच्या परिमाणाबाबत

**(३८) ३४४२१ (२१-१२-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.संजय कदम (दापोली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण व शहरी भागाकरिता शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०१५ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थेतंर्गत रॉकेल वितरणाचे परिमाण नव्याने निश्चित केले असून आता शहरी व ग्रामीण भागातील बिगर गॅस शिधापत्रिका धारकांना एकाच परिमाणात रॉकेल मिळणार असून शिधापत्रिकेवरील व्यक्तींची संख्या एक असल्यास प्रतिमाह एक लिटर, दोन व्यक्ती असल्यास तीन लिटर व तीन पेक्षा जास्त व्यक्ती असल्यास चार लिटर रॉकेल मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी शिधापत्रिकेवर सर्वाधिक सात व्यक्ती असल्यास १४ लिटर रॉकेल मिळत होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये शासनाच्या उक्त आदेशाप्रमाणे २ लाख १५ हजार ७०० लिटर रॉकेल आवश्यक असताना माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१५ मध्ये वरील कोट्याच्या फक्त ६० टक्के रॉकेलचा पुरवठा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निकष करण्याची कारणे काय आहेत व रॉकेलचा कोटा वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१६) :**(१) राज्यात ग्रामीण व शहरी भागाकरीता शासनाने दिनांक २०/८/२०१५ पासून सार्वजनिक वितरणा व्यवस्थेअंतर्गत केरोसिन वितरणाचे परिणाम नव्याने निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

सदर परिमाणानुसार एक व्यक्ती शिधापत्रिकाधारकास दोन लिटर, दोन व्यक्ती

शिधापत्रिकाधारकास तीन लिटर, तीन व त्यापेक्षा जास्त व्यक्ती शिधापत्रिकाधारकास चार लिटर केरोसिन अनुज्ञेय आहे.

(२) दिनांक २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले परिमाण लागू होण्यापूर्वी सात व्यक्ती शिधापत्रिकाधारकास चार लिटर केरोसिन अनुज्ञेय आहे.

(३) हे खरे नाही.

दि.२० ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या परिमाणानुसार सांगोले तालुकयाची केरोसिनची मागणी १३७ कि.ली. असून माहे सप्टेंबर, २०१५ पासून सदर तालुक्यास १३२ कि.ली (मागणीच्या ९६.६५%) इतके केरोसिन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या आदेशानुसार राज्यात ग्रामीण व शहरी भागाकरीता केरोसिनचे समान परिमाण निश्चित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दापशेड (ता. लोहा,जि.नांदेड) येथील पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत**

**(३९) ३४६८६ (२१-१२-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापशेड (ता. लोहा,जि.नांदेड) येथे गत आठ वर्षापूर्वी जिल्हा परिषद नांदेडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने लाखो रुपये खर्च करुन पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजना बंद असल्याने सदर गावातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावातील पिण्याच्या पाण्याचे टँकरही बंद करण्यात आल्याने याच गावातील गणेश शंकर मोरे हा युवक पिण्याचे पाणी आणण्यासाठी ४५ फूट विहिरीत पडून गंभीर जखमी झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावातील पाणी पुरवठा योजना बंद अवस्थेत असण्याची कारणे काय आहेत व सदर योजना तातडीने कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मौ.दापशेड, (ता.लोहा, जि. नांदेड) येथे सन २००७ मध्ये भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत योजना मंजूर करुन २००९ मध्ये कार्यान्वित केली आहे.

सदर योजनेचा उद्भव सोनखेड तलावामध्ये असून सदर तलावातून गावातील विहिर व भूस्थिर जलकुंभामध्ये पाणी सोडून पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु या वर्षी तलावात पाणी

नसल्यामुळे विहिरीत पाणी साठा अत्यल्प आहे, यामुळे गावास मार्च २०१५ पासून दोन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(३) अशत: खरे आहे.

सदर गावास मार्च २०१५ पासून ते अद्यापपर्यंत खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. दरम्यान, जून ते सप्टेंबर २०१५ या कालावधीत काही दिवस टँकर तात्पुरते बंद होते.

श्री. गणेश शंकर मोरे हा युवक खाजगी विहिरीत पडून किरकोळ जखमी झाला आहे.
(४) गेल्या तीन वर्षापासून कमली पर्जन्यामुळे तलावात पाणी साठा झालेला नाही त्यामुळे विहिरीतून पाणी पूरवठा अत्यल्प होत असल्याने योजना बंद असून गावास दोन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तलावात पाणी साठा उपलब्ध झाल्यानंतर योजना पुनकार्यान्वित होऊ शकेल.
(५) सदर योजना २००७ मध्ये घेवून सन २००९ मध्ये कार्यान्वित केली आहे. त्यामुळे योजना कार्यन्वित करण्यास विलंब झालेला नाही.

---

## साकोली, लाखांदूर व लाखनी (जि.भंडारा) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(४०) ३४७८१ (२१-१२-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकोली, लाखांदूर व लाखनी (जि.भंडारा) तालुक्यात किती पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असून त्यातून किती गावांना पाणीपुरवठा केला जातो,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील किती योजना बंद असून त्याची कारणे काय आहेत व सदर योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :**(१) भंडारा जिल्हयात साकोली-३४, लाखांदुर-५९ व लाखानी-४३ अशा एकूण १३६ नळयोजनाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.
(२) साकोली तालुक्यातील ४ गावांच्या नळ योजना बंद आहेत.

| गावाचे नांव | योजना बंद असल्याची कारणे व उपाययोजना |
|---|---|
| (१) शिवनीबांध | विद्युत देयक थकल्यामुळे |
| (२) जांभळी/खांबा | गावकऱ्यांची मागणी नसल्यामुळे |
| (३) खांबा/रेंगेपार | |
| (४) पिंडकेपार | स्त्रोत अपुरा पडत असल्याने |

वरीलपैकी शिवनीबांध व पिंडकेपार या दोन गावांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्य लाखनी-साकोली प्रादेशिक (१९ गावे) या नळ पाणीपुरवठा योजनेत समावेश करण्यात आलेला आहे.

लाखनी तालुक्यातील गराडा व रामपूरी या २ गावांच्या नळ पाणीपुरवठा योजना गावकऱ्यांची मागणी नसल्यामुळे बंद आहेत. सद्य:स्थितीत वरील गावांना अस्तित्वातील सार्वजनिक स्त्रोतांमधून पाणी पुरवठा उपलब्ध होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील अन्नधान्य वितरण कार्यालयामध्ये तीन परिमंडळ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४१) ३५४३५ (२१-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अन्नधान्य वितरण कार्यालयांतर्गत असलेल्या आठ परिमंडळ कार्यालयांपैकी तीन परिमंडळ अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी, नवीन शिधापत्रिका, नाव, पत्ता दुरुस्तीसह विविध प्रकारचे हजारो अर्ज "ह" परिमंडळामध्ये दीड ते दोन महिन्यांपासून सुमारे ६०० ते ७०० अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त परिमंडळ "ह" कार्यालयाकडून एक वर्षाचा कालावधी उलटून शिधापत्रिका मिळत नसल्याचे तसेच सदर कार्यालयात दलालांचा मोठ्या प्रमाणात वावर सुरू असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत व संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) शिधापत्रिका मिळत नाही ही बाब खरी नाही. दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कार्यालयात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. पोलीस गार्ड नेमण्याबाबतची विनंती पोलीस विभागास करण्यात आली आहे. शिधापत्रिका धारकांना व

नागरीकांना सेवा देणे व दलालांना आळा घालण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात शासनमान्य स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचे धान्य वितरण होत असल्याबाबत**

**(४२) ३५६११ (२१-१२-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरात शासनमान्य स्वस्त धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचे गहू, तांदूळ, गोरगरीब, अंध अपंगांना वितरीत केला जात असून शासनाच्या विरोधात सर्वत्र संताप व्यक्त करीत असल्याची घटना माहे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने योग्य प्रतीचे धान्य वितरित करण्याकरिता व दोषी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील ४० (उप) या शिधावाटप कार्यालयातील दक्षता समिती सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(४३) ३५६३९ (२१-१२-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) मतदार संघातील ४० (उप) या शिधावाटप कार्यालयासाठी नियुक्त करावयाच्या दक्षता समिती सदस्यांची नियुक्ती करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी, मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच नियंत्रक मुंबई हयांच्याकडे दिनांक २१ मे,२०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दक्षता समिती नियुक्ती न झाल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दक्षता समिती नियुक्ती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) दक्षता समित्या स्थायी स्वरुपाच्या असून, सदर ठिकाणी दक्षता समित्यांची मासिक सभा झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे सदर निवेदन व दक्षता समितीवरील सदस्यांच्या नियुक्तीबाबतच्या शिफारशी पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी मा.पालकमंत्री, ठाणे यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत. तसेच अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत व नियमित मासिक सभा घेण्याबाबत शासन स्तरावर सर्व संबंधितांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पूरक बारागाव पिंप्री (ता. सिन्नर,जि. नाशिक) व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे टप्पा क्र. ३ च्या कामास परवानगी मिळणेबाबत**

**(४४) ३५७४२ (२१-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूरक बारागाव पिंप्री (ता. सिन्नर,जि. नाशिक) व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे,शासनाकडे टप्पा क्र. ३ च्या कामास परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला असून टप्पा क्र. ३ मधील आवश्यक कामे जलकुंभ, वितरण व्यवस्था इत्यादींना परवानगी मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ व दिनांक २५ मे,२०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मागणीचे अनुषंगाने शासनपत्र क्र. ग्रापापु २०१४/ प्रक्र१३५/पापु ०९ दि.३०.७.२०१५ अन्वये टप्पा ३ च्या कामांना परवानगी देण्यात आली असून त्यानुसार योजनेतील उंच जलकुंभ व वितरण व्यवस्था इत्यादी कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि. नाशिक) येथील प्रादेशिक योजनेतील गावांचा/वाड्या/वस्त्यांचा समावेश कृती आराखड्यात करण्याबाबत**

**(४५) ३५७४३ (२१-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि. नाशिक) तालुका कायमस्वरूपी दुष्काळी तालुका असून येथे मोठ्या प्रमाणात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा लागतो. सदर टँकरची संख्या कमी करण्यासाठी सदर ठिकाणच्या कालमर्यादा संपलेल्या प्रादेशिक योजनांचे पुनरुज्जीवन करण्याच्या अनुषंगाने योजनेतील गावांचा/वाड्या/वस्त्यांचा कृती आराखड्यात समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिधींनी दि. ५ जानेवारी २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सिन्नर तालुक्यात राबविण्यात आलेल्य १) मनेगांव व १६ गावे २) कणकोरी व ५ गावे ३) नायगांव व ९ गावे ४) ठाणगांव व ५ गावे या योजनांपैकी मनेगाव व १६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा संकल्पित कालावधी संपल्याने सदर योजना पुनरुज्जिवीत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजनेचा सन २०१५-१६ च्या कृती आराखडयात समावेश करण्यात आलेला आहे. तथापि नविन योजनांची कामे हाती घेण्यात येवू नये असे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. त्यामुळे सदर योजनेचा समावेश मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयात करण्याकरीता प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये नवीन शिधापत्रिका वाटपाचे काम बंद असल्याबाबत**

**(४६) ३५७७० (२१-१२-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून नवीन शिधापत्रिका वाटपाचे काम बंद असल्यामुळे नागरिकांना स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळण्याचे बंद झाले असून त्यांना विविध योजनांचा लाभ घेण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन शिधापत्रिका न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शिधापत्रिका वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२-०२-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अन्नसुरक्षा आयुक्तांची व आयुक्तालयाच्या पद निर्मितीबाबत**

**(४७) ३६२४५ (२१-१२-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने अन्नसुरक्षा कायद्यानुसार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाना अत्यल्प दरात गहू आणि तांदुळ मिळणार असून सदर कायद्यान्वये अद्यापपर्यंत अन्नसुरक्षा आयुक्तांची नियुक्ती केली नसल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्नसुरक्षा आयुक्तालयाच्या पद निर्मितीची प्रक्रीयाही आजतागायत पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अन्नसुरक्षा योजनेची तातडीने अंमलबजावणी होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर योजना किती कालावधीत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-०२-२०१६) :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मध्ये '' राज्य अन्न आयोग'' स्थापन करण्याची तरतूद आहे. दि. १ फेब्रवारी, २०१४ पासून सदर अधिनियमाची अंमजबजावणी राज्यात सुरु करण्याच्या दृष्टीने दि.८ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सचिव (अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली सदर आयोगाचे काम पाहण्याकरीता समिती स्थापना करण्यात आली आहे. ''राज्य अन्न आयोग'' स्थापन करण्याकरीता आवश्यक पदांच्या निमितीच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत असून सदर प्रस्ताव वित्त विभागामार्फत मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही पूर्ण झाल्यावर '' राज्य अन्न आयोग'' स्थापण्याबाबतचे आदेश निर्गमि करण्यात येतील.

---

**केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शिधापत्रिकेचा वापर केवळ स्वस्त धान्य वितरणासाठी असताना राज्यात अन्य कामासाठी सक्ती करण्यात येत असल्याबाबत**

**(४८) ३६२८३ (२१-१२-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार शिधापत्रिकेचा वापर केवळ स्वस्त धान्य वितरणासाठी असताना राज्यात अन्य कामासाठी शिधापत्रिकेची सक्ती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शिधापत्रिकेचा वापर धान्याव्यतिरिक्त अन्य कामास करू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०२-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, अन्नधान्य वितरणा व्यतिरिक्त शिधापत्रिकेचा निवासी पुरावा वा इतर गोष्टींसाठी वापर न करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ५/६/२०१०, ४/२/२०१२ व ४/११/२०१५ अन्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बी.पी.एल. धारक लाभार्थ्यांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत**

**(४९) ३६४५८ (२१-१२-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाचा विविध शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी जे.बी.पी.एल. धारक नाही अशा व्यक्तीला किमान उत्पन्नाची मर्यादा रु. २१,०००/- आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान उत्पन्नाची मर्यादा रु. २१,०००/- असल्यामुळे बरेच लाभार्थी सदर शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकत नाही त्यामुळे शासनाने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे शासनाच्या योजना खालच्या लोकांपर्यंत पोहचू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी रुपये ४०,०००/- किमान उत्पन्नाची मर्यादा दिल्यास अनेक लाभार्थी सदर विविध शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकतात, हे ही खरे आहे काय ?

**श्री. गिरीश बापट (१९-०१-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

ग्रामीण भागात एपीएल (केशरी) गटातून कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ४४,०००/- व शहरी भागात रु. ५९,०००/- हजार पर्यन्त कमाल उत्पन्न मर्यादा असलेल्या लाभार्थ्यांना प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून निवडण्याचे निकष शासन निर्णय क्र. असुका २०१३/प्र.क्र.३१९/नापु-२२, दि. १७.१२.२०१३ अन्वये विहित करण्यात आले आहेत. या नुसार पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत विहित केलेल्या निकषानुसार अन्न धान्य देण्यात येते.

(३) उपरोक्त शासन निर्णयान्वये लाभार्थी ठरविण्याबाबतचे निकष इतर शासकीय योजनांसाठी लागू ठरत नाहीत.

---

**अजग बंगला, सिव्हील लाईन येथील धान्य साठवुन ठेवण्यात येणाऱ्या गोदामांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५०) ३६६८५ (२१-१२-२०१५). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अजग बंगला, सिव्हील लाईन येथील धान्य साठवुन ठेवण्यात येणाऱ्या गोदामांची दुरुस्ती अभावी येथील गोदामामध्ये साठविलेले धान्य पावसाळयात सडल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशन दुकानदारांना सडलेल्या अवस्थेत असलेले धान्य पुरविण्यात आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, येथील कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन वाढ करण्यात आलेली नाही व गोदामामध्ये प्राथमिक मुलभुत सोई-सुविधा पुरविण्यात आलेल्या नसल्याने याला जबाबदार असलेल्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (३०-०१-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदरहू शासकीय गोदामाचे व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडे असून त्यामध्ये कार्यरत महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य वखार महामंडळाकडून नियमितपणे वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.